# मेळाघाटातील गावाला दिसणार प्रकाशाची वाट

▸ प्रतिनिधी

**पुणे, दि. १ :** कुपोषणामुळे होणारे मृत्यू आणि आरोग्य सुविधांचा उडालेला बोजवारा यामुळे चर्चेत असलेल्या मेळाघाटातील गावाला आता प्रकाशाची वाट दिसणार आहे. या भागात असलेल्या डोमी या गावाला अमेरिकेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सूर्यदिवे देण्यात येणार आहेत.

## अमेरिकी विद्यार्थ्यांचा डोमी गावात उपक्रम

पुण्यातील मैत्री ही स्वयंसेवी संस्था मेळाघाटातील कुपोषणग्रस्त गावात काम करीत आहे. या संस्थेमार्फत या भागातील २० गावांत विविध प्रकारची सेवाकार्ये चालविली जातात. आरोग्य सुविधांच्या अभावाबरोबरच विजेची कमतरता हा मोठा प्रश्न या गावांना भेडसावत आहे. या भागात असणारी विजेची समस्या कमी करण्याच्या दृष्टीने अमेरिकेतील कोलोरॅडो विद्यापीठात शिकणाऱ्या ११ विद्यार्थ्यांनी या गावात सूर्यदिवे देण्याचा निर्णय घेतला आहे. हे विद्यार्थी पर्यायी ऊर्जेच्या विषयात विद्यापीठात अध्ययन करीत आहेत. हे सर्व विद्यार्थी आणि त्यांचे दोन शिक्षक आज मेळाघाटातील डोमी गावात जाणार आहेत. कोलोरॅडो विद्यापीठात विविध सामाजिक विषयावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे समूह आहेत. दर वर्षी हे विद्यार्थी जगभरातील वेगवेगळ्या भागांत असणाऱ्या अविकसित भागातील समस्यांचा अभ्यास करतात आणि त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतात. त्यासाठी लागणारा निधीही हे विद्यार्थी जमवीत असतात.

महाराष्ट्र एक्स्प्रेसने मेळाघाटाकडे जाणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या समूहाचे नेतृत्व दीप्ती वाघेला ही ओरिसात ग्रामविकास क्षेत्रात काम करणारी कार्यकर्ती करणार आहे. या समूहात वाग्मा मोमेंटी, मारिया, मिशेल ग्युलिओ, जेसी सीटझ्‌पॅट्रिक, डॅनिअल ल्युस्टिक, कॅशलिन, एरिका हॅमिल्टन, मेग ओब्युची, मायका बेनेट, टिम अँब्र्युजो, ब्रुस कॉरिअर, एली कॉरिअर यांचा समावेश आहे. सूर्यदिवे देण्यात येणारे डोमी हे गाव मेळाघाटातील एक सुव्यवस्थित गाव म्हणून ओळखले जाते. या गावात ग्रामसभेच्या माध्यमातून निर्णय घेतले जातात आणि ग्रामकोशाच्या गंगाजळीतून विकासकामे करण्यात येतात, असे मैत्रीच्या डॉ. अर्चना फणसळकर यांनी सांगितले. हे विद्यार्थी कोथरूड येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन येथे सध्या वास्तव्यास आहेत. आज सायंकाळी साडेसहाला पत्रकार संघात हे विद्यार्थी त्यांच्या अभियानाची माहिती देणार आहेत.